मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# निवडणूक आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी तात्काळ सुरू करा

## जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांचे निर्देश



। पिंपरी-चिंचवड।
न्यूज एक्स्प्रेस मराठी।

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला असून स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या परिसरात निवडणूक आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी तात्काळ सुरू करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले. आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस शिरुर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, उपजिल्हाधिकारी भाऊसाहेब गलांडे आदी उपस्थित होते. डॉ.दिवसे म्हणाले, निवडणूक आदर्श आचारसंहिता लागू झाली असून ६ जूनपर्यंत ती लागू राहणार आहे. जिल्ह्यात दोन टप्प्यात मतदान होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी शासकीय-निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेले भित्तीपत्रक, झेंडे, कटआऊट्स, संदेश काढून त्याचा अहवाल २४ तासात सादर करावा. भिंतीवरील रंगविलेल्या जाहिरातीदेखील काढण्यात याव्यात. शासकीय मैदाने, रस्ते, उद्याने, विद्युत खांब, खाजगी मालमत्तेवर परवानगी न घेता लावलेले भित्तीपत्रक किंवा संदेशही ४८ तासात काढण्यात यावेत. परवानगी न घेता खाजगी मालमत्तेवर जाहिरात केली असल्यास गुन्हे दाखल करण्यात यावेत. सर्वांनी काटेकोरपणे निवडणूक आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करावी. 'सी-व्हिजील' ॲपवर आलेल्या तक्रारींसंदर्भात तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

फलकावर राजकीय जाहिराती प्रसिद्ध करण्यासाठी सर्वांना समान संधी असावी व त्याबाबतचा करार झालेला असावा, त्याची खर्चात नोंद होणे आवश्यक आहे. निश्चित केलेली सभा ठिकाणी सर्व राजकीय पक्षांना सभा घेण्याची समान संधी देण्याबाबत संबंधित यंत्रणेमार्फत कार्यवाही करण्यात यावी. पक्षांनी परवानगी घेतलेल्या खाजगी वाहनाशिवाय इतर वाहनांवर जाहिरात करता येणार नाही. अशी वाहने आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, असेही जिल्हाधिकारी डॉ.दिवसे यांनी सांगितले.

निवडणूक यंत्रणेने गेल्या तीन महिन्यात मतदार नोंदणी आणि जनजागृतीसाठी चांगले परिश्रम घेतले आहेत. यापुढेही चांगली कामगिरी करून निवडणुका पारदर्शक आणि मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी विशेष प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीला जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघातील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, आदर्श आचारसंहिता समन्वयक अधिकारी उपस्थित होते.

# लिफ्टमध्ये अडकलेल्या ७ जणांची सुखरूप सुटका

## रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घटना घडली



। पिंपरी-चिंचवड।

लिफ्ट मध्ये अडकलेल्या सात जणांची अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप सुटका केली आहे. पिंपरी येथील मोरवाडी भागात असलेल्या रॉयल रेसिडेन्सी या सोसायटीत काल (दि.१६) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.पिंपरीतील मोरवाडी येथील रॉयल रेसिडेन्सी या सोसायटीतील लिफ्टमध्ये काल रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास सात व्यक्ती अडकले होते. लिफ्ट तिसऱ्या मजल्यावर अचानकपणे बंद पडली होती.

त्यानंतर हनुमंत गुब्याड यांनी ९.११ वाजता अग्निशमन दलाला याबाबत माहिती दिली. त्यानंतर काही वेळातच पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्यालयातील अग्निशमन केंद्रातील कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. आणि त्यांनी लिफ्ट मध्ये अडकलेल्या सात व्यक्तींची लिफ्ट कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने सुखरूप सुटका केली. सुटका केलेल्या व्यक्तींची नावे पुढील प्रमाणे – १) फयाज (१० वर्ष) कुदळवाडी, २) अंबादास हांडे (६२ वर्ष) जुन्नर, ३) वसंत सातपुते (५७वर्ष) संगमनेर, ४) महादेव सातपुते (६० वर्ष) पुणे, ५) सोन्या सातपुते (५७वर्ष) संगमनेर, ६) जगन्नाथ सातपुते (५४वर्ष) संगमनेर, ७) दिलीप भालके (५७ वर्ष) मोशी. या रेस्क्यू ऑपरेशन मध्ये घटनास्थळी विठ्ठल सफकाळ (लिफा), अमोल चिपळूणकर (.उ.ज), चंद्रकांत चव्हाण (ढ.ड.ज), विकास कुटे (ढऋ ), महेश इंदलकर (ढऋ), दिपेश दिवेकर (ढऋ ), योगेश ढोले (ढऋ) हे कर्मचारी उपस्थित होते.

# पिंपरीमधील गुंडाचा इंदापूरमध्ये गोळ्या झाडून खून

## हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी ग्रामीण पोलिसांनी पथके रवाना



**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड शहरातील गुंडाचा इंदापूरमधील हॉटेलमध्ये शनिवारी रात्री पिस्तुलातून गोळ्या झाडून खून करण्यात आल्याची खळबळजनक घटना घडली. हॉटेलमध्ये मित्रांसोबत जेवायला थांबलेल्या गुंडावर हल्लेखोरांनी पिस्तुलातून गोळ्या झाडून, तसेच कोयत्याने वार करून खून केला. पसार झालेल्या हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी ग्रामीण पोलिसांनी पथके रवाना केली आहेत.अविनाश बाळू धनवे (वय ३०, रा. वडमुखवाडी, चऱ्होली, पिंपरी-चिंचवड) असे खून झालेल्याचे नाव आहे. अविनाश विरुद्ध पिंपरी-चिंचवड शहरात पाच ते सहा गंभीर गुन्हे दाखल आहेत. अविनाश आणि त्याचे मित्र शनिवारी मोटारीतून पंढरपूरकडे निघाले होते. रात्री आठच्या सुमारास ते इंदापुरातील जगदंब हॉटेलमध्ये जेवण करण्यासाठी थांबले. अविनाश याच्यावर हल्लेखोरांनी पाळत ठेवली होती. हॉटेलमध्ये मित्रांसोबत अविनाश गप्पा मारत बसला होता. त्यांनी जेवण मागविले होते. त्यावेळी पाठीमागून आलेल्या हल्लेखोरांनी खुर्चीत बसलेल्या अविनाशवर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या, तसेच त्याच्यावर कोयत्याने वार केले. हल्लेखोर हॉटेलबाहेर लावलेल्या मोटारीतून पसार झाले. हॉटेलमध्ये गोळीबार झाल्यानंतर घबराट उडाली. या घटनेची माहिती मिळताच इंदापूर पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक कोकणे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी रात्री उशिरा घटनास्थळी भेट दिली. तातडीने हल्लेखोरांना पकडण्याच्या सूचना दिल्या. पसार झालेल्या हल्लेखोरांचा माग काढण्यासाठी पोलिसांनी पथके तयार केली आहेत. प्राथमिक चौकशीत अविनाशचा खून पूर्ववैमनस्यातून झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हल्लेखोर सीसीटीव्ही चित्रीकरणात पिंपरी चिंचवडमधील गुंड अविनाश धनवे याच्यावर हल्ला करणारे आरोपी आणि खुनाच्या घटनेचे चित्रीकरण हॉटेलमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केले आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले आहे.

### हल्लेखोर मोटारीतून पसार

» हॉटेलमध्ये मित्रांसोबत जेवायला थांबलेल्या गुंडावर हल्लेखोरांनी पिस्तुलातून गोळ्या झाडून, तसेच कोयत्याने वार करून खून केला. पसार झालेल्या हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी ग्रामीण पोलिसांनी पथके रवाना केली आहेत.अविनाश बाळू धनवे (वय ३०, रा. वडमुखवाडी, चऱ्होली, पिंपरी-चिंचवड) असे खून झालेल्याचे नाव आहे. अविनाश विरुद्ध पिंपरी-चिंचवड शहरात पाच ते सहा गंभीर गुन्हे दाखल आहेत. अविनाश आणि त्याचे मित्र शनिवारी मोटारीतून पंढरपूरकडे निघाले होते. रात्री आठच्या सुमारास ते इंदापुरातील जगदंब हॉटेलमध्ये जेवण करण्यासाठी थांबले. अविनाश याच्यावर हल्लेखोरांनी पाळत ठेवली होती. हॉटेलमध्ये मित्रांसोबत अविनाश गप्पा मारत बसला होता. त्यांनी जेवण मागविले होते. त्यावेळी पाठीमागून आलेल्या हल्लेखोरांनी खुर्चीत बसलेल्या अविनाशवर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या, तसेच त्याच्यावर कोयत्याने वार केले. हल्लेखोर हॉटेलबाहेर लावलेल्या मोटारीतून पसार झाले.

# बारणेंच्या उमेदवारीला भेगडे समर्थकांकडून विरोध

## मावळमधील बाळा भेगडे यांचे समर्थक अधिक आक्रमक झाले



**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांच्या उमेदवारीला आमदार सुनील शेळके पाठोपाठ भाजपचे माजी मंत्री बाळा भेगडे यांच्या समर्थकांनी विरोध केला आहे. श्रीरंग बारणे हे आज मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटण्यासाठी गेले आहेत. त्यामुळे मावळमधील बाळा भेगडे यांचे समर्थक अधिक आक्रमक झाले असून त्यांच्या उमेदवारीला त्यांनी विरोध केला आहे. बाळ भेगडे यांच्या उपस्थितीत कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत कार्यकर्त्यांनी बारणे यांच्या विरोधात सूर लावला. त्यांच्या उमेदवारीला विरोध दर्शवला आहे.मावळ ल ा ेक स भ ेच य ा उमेदवारीसाठी खासदार श्रीरंग बारणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या भेटीला मुंबईत पोहचले आहेत. दुसरीकडे मतदारसंघात मात्र भाजप एकवटली आहे. आम्ही दोनवेळा बारणेंसाठी झटलो. पण आता आम्हाला बारणे उमेदवार नकोत. यावेळी माजी राज्यमंत्री बाळा भेगडेंना उमेदवारी द्या. असाच सूर या बैठकीत होता. भेगडेंच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळकेंनी बारणेंना सुरुवातीपासूनच विरोध दर्शविला आहे. अशात भाजपचे पदाधिकारीही भेगडेंसाठी आक्रमक झाले आहेत. सोमवारपर्यंत शिंदे गटाकडून बारणेंच्या उमेदवारीची घोषणा होणं अपेक्षित आहे. पण, त्याआधी होणारी ही बैठक बारणेंची डोकेदुखी आणखीनच वाढवणार हे निश्चित आहे.

# यंदा 'रेडीरेकनर'च्या दरात वाढ?

## शहरी भागात ९ टक्के, ग्रामीण क्षेत्रात ७ टक्के दरवाढ प्रस्तावित



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्याच्या मंत्रिमंडळाने वार्षिक चालू बाजारमूल्याचे (रेडीरेकनर) नवीन दर आहे तेच ठेवण्याबाबत निर्णय न घेतल्याने यंदा रेडीरेकनरच्या दरात वाढ केली जाणार आहे. ही दरवाढीची १ एप्रिलपासून किंवा लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. राज्याच्या नोंदणी आणि मुद्रांक विभागाकडून शहरी भागात नऊ टक्के, नगरपरिषद क्षेत्रात चार टक्के, प्रभाव क्षेत्रात साडेचार टक्के आणि ग्रामीण भागात सात टक्के अशी दरवाढ प्रस्तावित केली आहे.दरवर्षी १ एप्रिलपासून रेडीरेकनरचे नवीन दर जाहीर केले जातात. गेल्या वर्षी कोणतीही दरवाढ करण्यात आली नव्हती. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला होता. रेडीरेकनरचे दर निश्चित करण्याच्या पद्धतीमध्ये बदल करण्यात आला आहे. त्यानुसार आता नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाकडून रेडीरेकनरचे दर निश्चित करण्यात आल्यावर राज्य सरकारकडून त्यावर निर्णय घेण्यात येतो आणि हा निर्णय नोंदणी महानिरीक्षक जाहीर करतात.यंदा लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे राज्य सरकारकडून हस्तक्षेप करण्यात येणार नाही. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी झालेल्या मंत्रिमंडळांच्या बैठकीतही रेडीरेकनरच्या दराबाबत राज्य सरकारने कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे यंदा रेडीरेकनरचे दर 'जैसे थे' ठेवण्यात येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या वर्षभरात झालेल्या आर्थिक व्यवहारांबाबत माहिती घेऊन नवीन दर निश्चित करण्यात आले आहेत. गेल्या वर्षभरात दस्तनोंदणीचे प्रमाण वाढले असून महसुलात भरभक्कम वाढ झाली आहे. १५ मार्चपर्यंत तब्बल ४५ हजार ४५० कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे. ही बाब विचारात घेऊन रेडीरेकनरचे नवे दर प्रस्तावित करण्यात आले आहेत. शहरी भागात नऊ टक्केतर ग्रामीण भागात सात टक्के अशी वाढ प्रस्तावित केली आहे.

» राज्याच्या नोंदणी आणि मुद्रांक विभागाकडून शहरी भागात नऊ टक्के, नगरपरिषद क्षेत्रात चार टक्के, प्रभाव क्षेत्रात साडेचार टक्के आणि ग्रामीण भागात सात टक्के अशी दरवाढ प्रस्तावित केली आहे. दरवर्षी १ एप्रिलपासून रेडीरेकनरचे नवीन दर जाहीर केले जातात. गेल्या वर्षी कोणतीही दरवाढ करण्यात आली नव्हती. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला होता. रेडीरेकनरचे दर निश्चित करण्याच्या पद्धतीमध्ये बदल करण्यात आला आहे. त्यानुसार आता नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाकडून रेडीरेकनरचे दर निश्चित करण्यात आल्यावर राज्य सरकारकडून त्यावर निर्णय घेण्यात येतो आणि हा निर्णय नोंदणी महानिरीक्षक जाहीर करतात.यंदा लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे राज्य सरकारकडून हस्तक्षेप करण्यात येणार नाही. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी झालेल्या मंत्रिमंडळांच्या बैठकीतही रेडीरेकनरच्या दराबाबत राज्य सरकारने कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे यंदा रेडीरेकनरचे दर 'जैसे थे' ठेवण्यात येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या वर्षभरात झालेल्या आर्थिक व्यवहारांबाबत माहिती घेऊन नवीन दर निश्चित करण्यात आले.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्याच्या मंत्रिमंडळाने वार्षिक चालू बाजारमूल्याचे (रेडीरेकनर) नवीन दर आहे .राज्याच्या नोंदणी आणि मुद्रांक विभागाकडून शहरी भागात नऊ टक्के, नगरपरिषद क्षेत्रात चार टक्के, प्रभाव क्षेत्रात साडेचार टक्के आणि ग्रामीण भागात सात टक्के अशी दरवाढ प्रस्तावित केली आहे.

# ...तर पुण्यात बॅलेट पेपरवर मतदान करावे लागेल!

## लोकसभा मतदारसंघात ३८४ उमेदवार उभे राहू शकतात



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** केंद्रीय निवडणूक आयोगाने शनिवारी सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केले. आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघांच्या निवडणूक तयारीबाबत जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

बारामती, शिरूर आणि मावळ मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनुक्रमे कविता द्विवेदी, दिपक सिंगला आणि अजय मोरे, पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख या वेळी उपस्थित होते. या पत्रकार परिषदेत पुण्यातील लोकसभा निवडणुकीबाबत जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी रविवारी मोठे विधान केले. डॉ. दिवसे म्हणाले, 'मतदान यंत्रांची क्षमता ही एका लोकसभा मतदारसंघात ३८४ उमेदवार उभे राहू शकतात, त्याला २४ बॅलेट युनिट जोडू शकतो आणि मतदान ईव्हीएमवर घेता येऊ शकेल. मात्र, त्यापेक्षा जास्त उमेदवार उभे राहिल्यास बॅलेट पेपरवर मतदान घ्यावे लागेल. अशी परिस्थिती येईलच असे आताच सांगता येणार नाही. बॅलेट पेपरवर निवडणूक झाल्यास मतदानासाठी जास्त मनुष्यबळ लागणार नाही, मात्र मतमोजणीवेळी जास्त टेबल लावावे लागतील. उमेदवारी अर्जांची छाननी झाल्यानंतर नेमक्या उमेदवारांची संख्या निश्चित झाल्यानंतर गरज भासल्यास केंद्रीय निवडणूक आयोगाकडे मार्गदर्शन मागविले जाईल. सद्य:स्थितीत जास्त उमेदवार निवडणुकीला उभे राहतील, ही बाब जर-तरची आहे. जिल्हा प्रशासनाने सर्व प्रकारची तयारी केली आहे. जास्त उमेदवार निवडणूक रिंगणात असल्यास संबंधित मतदारसंघापुरता वेगळा निर्णय केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मान्यतेने घेतला जाईललोकसभा मतदारसंघ असून बारामतीचे मतदान ७ मे, तर पुणे, शिरूर आणि मावळचे मतदान १३ मे रोजी होणार आहे.

# पुण्यात एनआयएची मोठी कारवाई

## दहशतवादी वास्तव्यास असलेली इमारत जप्त

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
कोंढव्यात इसिसच्या दहशतवाद्यांना बॉम्ब बनविण्याचे प्रशिक्षण मिळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) कोंढव्यात दहशतवादी वास्तव्यास असलेली इमारत जप्त केली.




एनआयएने मोहम्मद शहानाझ आलम, रिजवान अली, अब्दुलाह शेख, तलाह लियाकत खान, मोहम्मद इम्रान मोहम्मद युसुफ खान उर्फ मटका उर्फ अमीर अब्दुल हमिद खान (रा. रतलाम, मध्य प्रदेश), मोहम्मद युनुस मोहम्मद याकुब साकी उर्फ अदिल उर्फ अदिल सलीम खान (रा. रतलाम, मध्य प्रदेश), कादीर दस्तगिर पठाण उर्फ अब्दुल कादीर, समीब नासीरउद्दीन काझी (दोघे रा. कोंढवा, पुणे), जुल्फीकार अली बडोदवाला उर्फ लालाभाई उर्फ लाला उर्फ सईफ, शमिल साकिब नाचन आणि आकिफ अतिक नाचन (तिघेही रा. पडघा, ठाणे) यांना अटक केली. मोहम्मद आलमला कोथरूड परिसरात दुचाकी चोरताना पोलिसांनी पकडले होते.

त्यावेळी त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारांना पकडण्यात आले होते. तपासासाठी मोहम्मदला कोंढव्यात नेण्यात आले होते. तेव्हा तो पसार झाला होता. २ नोव्हेंबर २०२३ रोजी दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने त्याला पकडले. त्यानंतर त्याला तपासासाठी एनआयएच्या ताब्यात देण्यात आले. दहशतवाद्यांनी सातार्यातील साडीच्या दुकानात दरोडा टाकून त्यांनी बॉम्बस्फोटाचे साहित्य खरेदी केले होते. कोंढव्यात त्यांनी बॉम्ब कसा तयार करायचा याबाबतचे प्रशिक्षण घेतले होते. कोल्हापूर, सातारा परिसरातील जंगलात त्यांनी नियंत्रित पद्धतीने बॉम्बस्फोट केले होते. त्यांनी शस्त्र चालविण्याचे प्रशिक्षण घेतल्याचे तपासात उघड झाले होते. याप्रकरणात मोहम्मद आलम, रिजवान अली. अब्दुलाह शेख यांच्याविरुद्ध मुंबईतील विशेष न्यायालयात नुकतेच तिसरे पुरवणी आरोपपत्र दाखल केले. त्यानंतर एनआयएच्या पथकाने कोंढव्यातील मीठानगर परिसरातील इमारत जप्त केली.

### बॉम्ब बनविण्याचे प्रशिक्षण

» कोंढव्यात इसिसच्या दहशतवाद्यांना बॉम्ब बनविण्याचे प्रशिक्षण मिळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर राष्ट्रीय तपास यंत्रणेने कोंढव्यात दहशतवादी वास्तव्यास असलेली इमारत जप्त केली. एनआयएने मोहम्मद शहानाझ आलम, रिजवान अली, अब्दुलाह शेख, तलाह लियाकत खान, मोहम्मद इम्रान मोहम्मद युसुफ खान उर्फ मटका उर्फ अमीर अब्दुल हमिद खान , मोहम्मद युनुस मोहम्मद याकुब साकी उर्फ अदिल उर्फ अदिल सलीम खान, कादीर दस्तगिर पठाण उर्फ अब्दुल कादीर, समीब नासीरउद्दीन काझी , जुल्फीकार अली बडोदवाला उर्फ लालाभाई उर्फ लाला उर्फ सईफ, शमिल साकिब नाचन आणि आकिफ अतिक नाचन यांना अटक केली.

# फडणवीस हेच सगळ्यांवरील औषध : चंद्रकांत पाटील

## त्यांनी प्रेमानं जवळ घेवून समजावलं की विषयच संपला

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
आमच्याकडे महाराष्ट्राला समजावणारे देवेंद्र फडणवीस नावाचे मोठे औषध आहे. ते प्रेमाने जवळ घेवून बसले की सगळे विषय संपतात. त्यांची मात्रा सगळ्यांना लागू पडते. त्यामुळे सगळे 'नॉर्मल'ला येतील. पुढची 'गॅरंटी' प्रत्येकाला हवी आहे. ती दिली की पुढच्या आठवड्यात तुम्हाला सगळे एकत्र दिसतील, असे उच्च तंत्रज्ञान शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.बारामतीत महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. हर्षवर्धन पाटील यांनी शनिवारी रात्री फोन करत पुतण्याचा विवाह असल्याने आजच्या बैठकीला येत नसल्याचे स्पष्ट केले आहे. शिवाय गैरसमज नको म्हणून माझ्या वतीने बैठकीत माहिती द्या, असेही मला सांगितले असल्याचे पाटील म्हणाले. विजय शिवतारे यांनी बंडाचे निशाण फडकावल्याच्या प्रश्नावर ते म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी त्यांची चर्चा झाली आहे. मुख्यमंत्री त्यांची योग्य ती समजूत काढतील. त्यामुळे काळजीचे काही कारण नाही.मावळची जागा कोणी लढवायची हे अद्याप ठरलेले नाही. ती जागा शिवसेनेकडे गेली तरी बाळा भेगडे असो की अन्य आमचे पदाधिकारी त्यांचे काम करतील. राजकारणात इच्छा व्यक्त करण्यात गैर काही नाही. सध्या तेथे काही लोक इच्छा व्यक्त करत असतील. पण ज्या दिवशी उमेदवार जाहीर होईल त्या दिवशी भेगडे हे सुद्धा बारणे यांचा जयजयकार करतील, असे पाटील यांनी सांगितले. ते म्हणाले, आयुष्यभर राष्ट्रवादीशी संघर्ष केला, आता त्यांच्याबरोबर कसे जुळवून घेणार असा प्रश्न तुम्ही विचारत आहात. पण राजकारणात कायम तराजू सोबत ठेवायचा असतो. काय वजनदार आहे, काय हलके आहे हे बघायचे असते. शरद पवार यांचा पराभव महत्त्वाचा वाटतो २०१९ ला जनतेने भाजप-शिवसेनेला १६१ चा आकडा गाठून दिला असतानाही फूट पाडली गेली. केंद्रातील दोन वजनदार नेत्यांनाही आम्ही तुमच्यासोबत सरकार स्थापन करतो आहे, असे सांगत झुलवत ठेवले गेले. हे सगळे हिशोब चुकते करण्याची संधी आता आम्हाला बारामती लोकसभा मतदारसंघात निर्माण झाली आहे. ती यंदा जरूर पूर्णत्वाला जाईल. शरद पवार यांचा पराभव हेच आमचे ध्येय आहे, असेही मत पाटील यांनी सांगितले. समोरील पैलवानाने काही दिवसानंतर न लढताच हरलो असे घोषित केले तरी आश्चर्य वाटण्याचे कारण नाही, असेही पाटील म्हणाले. आरोप होतात, मग २०१९ ला शिवसेनेला सोबत घेणे ही फूट नव्हती का. त्यातून भाजपचे नव्हे तर राज्यातील जनतेचे नुकसान शरद पवार यांनी केले.